2021	IX	23	1500	J-555	(M)

PSYCHOLOGY (48)

Time : 3 Hrs. **(4 Pages)** **Max. Marks : 80**

ना : (१) सर्व प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे.

(२) उजवीकडील अंक पूर्ण गुण दर्शवितात.

(३) प्रत्येक प्रश्नाच्या उत्तराचा प्रारंभ नवीन पृष्ठावर करावा.

(अ) कंसातील योग्य पर्याय निवडून खालील विधाने पूर्ण करून पुन्हा लिहा : (५) [२०]

(१) मानसशास्त्र हे एक ------ विज्ञान आहे.

(अ) नैसर्गिक (ब) सामाजिक

(क) जैविक

(२) प्रवाही बुद्धिमत्ता आणि स्फटिक बुद्धिमत्ता या संकल्पना ------ यांनी मांडल्या.

(अ) कॅटेल (ब) थॉर्नडाईक

(क) स्पिअरमन

(३) शाईच्या डागांची चाचणी -------- यांनी विकसित केली.

(अ) मरे (ब) रोर्शा

(क) मॉर्गन

(४) एखाद्या उद्दीपकाला जाणीवेच्या केंद्रस्थानी आणण्याच्या प्रक्रियेला ------ म्हणतात.

(अ) अवधान (ब) संवेदन

(क) विचार

https://www.maharashtrastudy.com

(५) आपल्या संस्कृतीमध्ये एखादया व्यक्तीची ------ म्हणजे त्याच्या कुटुंयाचे प्रतिबिंब आहे असा विचार केला जातो.

(अ) व्यक्तीची बुद्धिमत्ता (ब) व्यक्तीचे वर्तन

(क) व्यक्तीचा दर्जा

(ब) खालील 'अ' व 'ब' गटांतील शब्दांच्या योग्य जोड्या लावा : (५)

'अ' गट	'ब' गट
(अ) वर्तनवाद	(१) स्टर्न
(ब) बहुविध बुद्धिमत्ता सिद्धांत	(२) उपचारातील अडथळा
(क) भयगंड	(३) पालकांचा घटस्फोट
(ड) चिंता	(४) जॉन वॅटसन
(इ) काळी जादू	(५) अतार्किक भीती
	(६) हॉवर्ड गार्डनर

(क) खालील विधाने 'बरोबर' आहेत की 'चूक' ते लिहा : (५)

(१) प्रयोगकर्ता ही अशी व्यक्ती होय जिच्यावर प्रयोग केला जातो.

(२) व्यक्तिमत्त्वाचा केवळ बाह्य स्वरूपाशी संबंध असतो.

(३) प्रयत्न अथवा सरावामुळे वर्तनातील बदलाला अध्ययन म्हणतात.

(४) छिन्नमनस्कता ही गंभीर मानसिक विकृती नाही.

(५) चिंता व्यक्तीच्या रोजच्या जीवनात अडथळा आणते.

(ड) खालील प्रश्नांची प्रत्येकी '<u>एका</u>' वाक्यात उत्तरे लिहा : (५)

(१) मानसशास्त्राची पहिली प्रयोगशाळा कोणत्या वर्षी सुरू झाली?

(२) बुद्धिमापन चाचण्यांचा जनक कोणाला म्हणतात?

(३) पर्सनॅलिटी हा शब्द कोणत्या लॅटिन शब्दापासून तयार झाला आहे?

(४) सर्जनशील विचाराची पहिली अवस्था कोणती?

(५) सकारात्मक मानसशास्त्राचा जनक कोणाला म्हणतात?

प्र. २. **खालील प्रश्नांची प्रत्येकी २५ ते ३० शब्दांत उत्तरे लिहा (कोणतीही <u>पाच</u>) :** [१०]

(१) सर्वेक्षण पद्धत म्हणजे काय ते थोडक्यात लिहा?

(२) मानसिक वय म्हणजे काय?

(३) चेतापदशिता म्हणजे काय?

(४) साधक अभिसंधानाद्वारे अध्ययन स्पष्ट करा.

(५) राग व्यवस्थापनातील शिथिलीकरण तंत्राचे महत्त्व तुमच्या शब्दांत लिहा.

https://www.maharashtrastudy.com

(६) प्रथमोपचाराची आवश्यकता असणारी चिंतेची शारीरिक लक्षणे लिहा.

(७) तद्नुभूती वाढविण्याचे कोणतेही दोन उपाय तुमच्या शब्दांत स्पष्ट करा.

प्र. ३. खालील बाबींवर प्रत्येकी ५० ते ६० शब्दांत टिपा लिहा (कोणत्याही चार) : [१

(१) तर्कसंगत व्यक्तीची कोणतीही तीन वैशिष्ट्ये

(२) भावनिक अनुभवातील शारीरिक बदल

(३) अमलीपदार्थ व्यसनासक्ती

(४) इंटरनेटवरील परावलंबित्व

(५) लवचिकतेचे प्रकार

(६) सहसंबंधाचे प्रकार

प्र. ४. खालील उदाहरणांवर आधारित प्रश्नांची केवळ शब्दांत उत्तरे लिहा (कोणतेही चार) :

(१) राहुलने प्रयोगाद्वारे मिळविलेल्या शास्त्रीय माहितीच कोणत्याही काळात, कोणत्याही ठिकाणी खातरजमा करता येते. ह शास्त्राच्या कोणत्या वैशिष्ट्याचे वर्णन आहे?

(२) वाढदिवसाच्या पार्टीला विवेक गेला असता, त्याचे मित्रमैत्रिणी मद्यपान करत होते. त्यांनी विवेकला आग्रह करूनही विवेकने मद्यपान करण्यास ठामपणे नकार दिला. विवेकच्या या वर्तनातून व्यक्तिमत्त्वाच्या पंचघटक प्रारूपातील कोणता गुण दिसून येतो? https://www.maharashtrastudy.com

(३) डॉक्टरांनी इंजेक्शन दिल्यावर रडणारी ईशा आता डॉक्टर दिसताच रडू लागते ही कोणत्या प्रकारची अध्ययन प्रक्रिया आहे?

(४) भावनिक सुदृढता राखण्यासाठी सुनिता चित्र रंगवते सुनिता भावनिक सुदृढता राखण्यासाठी कोणते तंत्र वापरते आहे?

(५) रोहन कधी अतिउत्साहात असतो, तर कधी विनाकारण खूप निराश असतो. ही लक्षणे कोणत्या मानसिक विकृतीची आहेत?

(६) अलीने पाहिले की, लॉकडाऊनमुळे आणि आर्थिक अडचणींमुळे रखवालदाराला पुरेसे अन्न मिळेनासे झाले आहे, म्हणून त्याने महिनाभराचे किराणा सामान रखवालदाराला आणून दिले. अलीचे हे वर्तन कोणती सकारात्मक गोष्ट दर्शविते?

प्र. ५. खालील संकल्पना २५ ते ३० शब्दांत स्पष्ट करा (कोणत्याही पाच) :

(१) सकारात्मक मानसशास्त्र

(२) कृत्रिम बुद्धिमत्ता

(३) अवधान दोलन

https://www.maharashtrastudy.com

(४) भावनिक गैरवर्तन

(५) विभ्रम

(६) मानसिक आजाराविषयी लाज

(७) शून्याच्या वर असलेले जीवन

प्र. ६. खालीलपैकी कोणत्याही दोन प्रश्नांची उत्तरे दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे प्रत्येकी ८० ते १०० शब्दांत लिहा : [१०]

(१) संवेदनांची संघटन तत्त्वे स्पष्ट करा :

उत्तराचे मुद्दे :

(i) समीपतेचे तत्त्व (ii) समानतेचे तत्त्व

(iii) सातत्याचे तत्त्व (iv) समावेशन तत्त्व

(२) भावनिक सुदृढ व्यक्तीस कोणते फायदे अनुभवास येतात ते स्पष्ट करा :

उत्तराचे मुद्दे :

(i) ताणाशी समायोजन (ii) उच्च स्व-नियमन

(iii) कार्यक्षमता विकास (iv) नवनिर्मिती क्षमता (सर्जनशीलता) विकास

(३) मानसिक विकृतींचे निकष स्पष्ट करा :

उत्तराचे मुद्दे :

(i) चिकित्सालयीन लक्षणे (ii) मनस्ताप व अक्षमता

(iii) कार्यात्मक बिघाड (iv) केवळ सामाजिक व सांस्कृतिक विचलित वर्तन अपसामान्य असेलच असे नाही.

प्र. ७. पुढीलपैकी कोणत्याही एका प्रश्नाचे उत्तर सुमारे १५० ते २०० शब्दांत स्पष्ट करा : [१०]

(१) बुद्धिमत्तेची व्याख्या लिहा व बुद्धिमापन चाचण्यांचे विविध प्रकार स्पष्ट करा.

(२) व्यक्तिमत्त्वाची व्याख्या लिहा व व्यक्तिमत्त्वावर परिणाम करणारे कोणतेही चार घटक स्पष्ट करा.

◆◆◆

https://www.maharashtrastudy.com